# यमतर्पण विधी

हि पुस्तिका आमच्या मातोश्री

**कै. सौ. स्नेहलता लक्ष्मण संत**

यांच्या स्मरणार्थ सर्व सश्रद्ध वैदिक बांधवांना सादर करत आहोत.

मंदार संत

# महत्त्व

दिवाळीमध्ये नरकचतुर्दशी या दिवशी वर्षभरात होऊ शकणारे अपमृत्यु टाळण्याकरिता, यमतर्पणाचा आवश्यक विधी शास्त्रात सांगितलेला आहे. हा विधी म्हणजे यमदेवांच्या नावांनी विशिष्ट पद्धतीने ताम्हणात पाणी सोडायचे असते. हा विधी आपल्या सोयीकरिता आम्ही पुढील वेगवेगळ्या Slides मध्ये टप्प्या टप्प्याने देत आहोत. खास करून साथीच्या आजारांच्या काळात हा विधी सांगणे व करणे अतिशय आवश्यक वाटते.

वरील यमतर्पणाची माहिती पंचांगकर्ते श्री गौरवशास्त्री देशपांडे यांच्या सौजन्याने

# महत्त्व

हा विधी आपला आपण करू शकतो. सांगितल्याप्रमाणे बिनचूक केल्यास पुरोहितांना बोलवायची आवश्यकता नसते. याला तयारी सह साधारण १५ मिनिटे लागतात.

१) पहाटे अभ्यंग स्नानाचे वेळेला भोपळा अथवा आघाड्याची पाने नरकनाशनार्थ अंगावरून ओवाळून टाकावीत.

२) स्नानसंध्या व सकाळची इतर आन्हीके असल्यास ती संपल्यावर यमदेवांना पुढील विधीत दिल्याप्रमाणे १४ नावांनी तर्पण करावे.

# तर्पण म्हणजे काय?

तर्पण हा शब्द 'तृप प्रीणने' या संस्कृत धातुपासून बनलेला आहे.
'सौहित्यं तर्पणं तृप्तिः" असे अमरकोशात आलेले आहे. तर्पण शब्दाचा अर्थ म्हणजे 'तृप्ती'. शास्त्रात दिलेल्या विधिविधानानुसार एखाद्या देवतेच्या किंवा पितरांच्या उद्देशाने त्या त्या देवतेची किंवा पितरांची तृप्ती व्हावी म्हणून केले जाणारे कर्म म्हणजे तर्पण होय.

# अपमृत्यू म्हणजे काय?

साधारणपणे कलियुगात सर्व मानवांना १०० वर्षांचे आयुष्य दिलेले असते. हे आयुष्य काही कारणाने कमी होणे व अकाली मृत्यू येणे अपघाताने मृत्यू येणे असे योग आपल्या पूर्वकर्मानुसार आपल्या पत्रिकेत असू शकतात ते टाळण्यासाठी शास्त्रकारांनी वरील विधी सुचवलेला आहे.

# यमतर्पण कुणी व कसे करावे ?

तर्पण करणाऱ्याचे वडील हयात असल्यास पुढील Slides ९ ते १० मध्ये दिल्याप्रमाणे विधी करावेत

तर्पण करणाऱ्याचे वडील हयात नसल्यास पुढील Slides ११ ते १२ मध्ये दिल्याप्रमाणे विधी करावेत

# नरक चतुर्दशी तर्पण विधी

मंदार संत

# तयारी



यमतर्पण करणार्यांने शक्यतो धोतर / पंचा नेसावा खांद्यावर उपरणे असावे सोबत स्वच्छ पाण्याने भरलेले भांडे व पळी / चमचा घ्यावा पाणी सोडण्यासाठी स्वच्छ ताम्हण / खोलगट ताटली घ्यावी

# जानवे / उपरणे घालायची पद्धत
## (स्वतः चे वडील हयात असल्यास)



मुंज झालेली असल्यास जानवे सव्य पद्धतीने
म्हणजे डाव्या खांद्यावरून उजव्या कंबरेकडे
(सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे)
घातलेले असावे. अन्यथा उपरणे डाव्या खांद्यावर ठेवावे.

# पाणी देण्याची पद्धत (स्वतः चे वडील हयात असल्यास)



१. पाण्यात काय घालावे= सातू

२. पाणी कुठून द्यावे= देवतीर्थ (उजव्या हाताच्या) (सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे)

३. पाणी किती वेळा द्यावे= एकदा

# जानवे / उपरणे घालायची पद्धत
## (स्वत: चे वडील हयात नसल्यास)



मुंज झालेली असल्यास जानवे अपसव्य पद्धतीने
म्हणजे उजव्या खांद्यावरून डाव्या कंबरेकडे
( सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे )
घातलेले असावे. अन्यथा उपरणे उजव्या खांद्यावर ठेवावे.

# पाणी देण्याची पद्धत
## (स्वतः चे वडील हयात नसल्यास)



मंदार संत

१. पाण्यात काय घालावे= काळे तीळ

२. पाणी कुठून द्यावे= पितृतीर्थ (उजव्या हाताच्या)
(सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे)

३. पाणी किती वेळा द्यावे= तीनदा

# तर्पण विधी

मागील Slides मध्ये सांगितल्याप्रमाणे पुढील Slides मध्ये सांगितलेल्या यमदेवांच्या नावांनी तर्पण करावे म्हणजे हातावरून पाणी सोडावे.

**उदाहरणार्थ :**

पाहिले नाव आहे यम. आता

**यमाय नमः**

असे म्हणून यमदेवांचे स्मरण करून त्यांना मनातल्या मनात नमस्कार करायचा. आणि

**यमं तर्पयामी**

असे म्हणून यमदेवांच्या प्रीत्यर्थ पूर्वी सांगितल्याप्रमाणे एकदा किंवा तीनदा पळीने हातावरून ताम्हणात पाणी सोडायचे. असे प्रत्येक नाम घेऊन १४ नामानी तर्पण करावे.

मंदार संत

मंदार संत

# नरक चतुर्दशी तर्पण विधी - संकल्प

**पळीने हातात पाणी घेऊन खालीलप्रमाणे संकल्प करावा**

अद्य श्रीब्रह्मणः द्वितीये परार्धे श्री श्वेतवाराहकल्पे जंबुद्विपे भरतवर्षे भरतखंडे दंडकारण्ये देशे वर्तमान व्यवहारिके विश्वावसुनाम्नी संवत्सरे दक्षिणाणायने शरदऋतौ आश्विन मासे कृष्णपक्षे चतुर्दश्यां तिथौ इंदुवासरे हस्तदिवसनक्षत्रे वैधृती योगे शकुनि करणे कन्यास्थिते श्रीचंद्रे तुलास्थिते श्रीसूर्ये मिथुनस्थिते श्री देवराजगुरौ शेषेषु ग्रहेषु यथायथं राशिस्थानानिस्थितेषु अमुक (आपले गोत्र सांगावे) गोत्रस्य अमुक नाम्ना (आपले नाव सांगावे) अहं मम आत्मनः श्रुतिस्मृती पुराणोक्त शास्त्रोक्त फलप्राप्तीद्वारा अपमृत्यु निवारणपूर्वक शनैश्चरादि ग्रहपीडा परिहारद्वारा श्रीयमस्वरूपी परमेश्वर प्रीत्यर्थं चतुर्दश नाममंत्रैः यमतर्पणाख्यं कर्म करिष्ये ।

(असे म्हणून हातातील पाणी ताम्हणात सोडावे)



# तर्पणाची नावे

१. यमाय नमः, यमं तर्पयामी ।

२. धर्मराजाय नमः, धर्मराजं तर्पयामी ।

३. मृत्युवे नमः, मृत्युं तर्पयामी ।

४. अंतकाय नमः, अंतकं तर्पयामी ।

५. वैवस्वताय नमः, वैवस्वतं तर्पयामी ।

६. कालाय नमः, कालं तर्पयामी ।

७. सर्वभूतक्षयाय नमः, सर्वभूतक्षयकरं तर्पयामी ।

# तर्पणाची नावे



८. औदुंबराय नमः, औदुंबरं तर्पयामी ।

९. दध्नाय नमः, दध्नं तर्पयामी ।

१०. नीलाय नमः, नीलं तर्पयामी ।

११. परमेष्ठीने नमः, परमेष्ठीनं तर्पयामी ।

१२. वृकोदराय नमः, वृकोदरं तर्पयामी ।

१३. चित्राय नमः, चित्रं तर्पयामी ।

१४. चित्रगुप्ताय नमः, चित्रगुप्तं तर्पयामी ।

मंदार संत

**१४ ही नावांनी तर्पण केल्यानंतर दक्षिणेकडे तोंड करून यमदेवांचे स्मरण करून खालील श्लोक १० वेळा म्हणावा.**

यमोनिहंता पितृधर्मराजो
वैवस्वतो दंडधरश्च कालः ।
भूताधिपो दत्त कृतानुसारी
कृतांत एतद्दशभिर्जपंति।।

# यमद्वितीया (भाऊ बीज)
# अर्घ्यप्रदान विधी

मंदार संत

# यम अर्घ्यदान कुणी व कसे करावे ?

मंदार संत

तर्पण करणाऱ्याचे **वडील हयात असल्यास** पुढील Slide 21 मध्ये दिल्याप्रमाणे विधी करावेत

तर्पण करणाऱ्याचे **वडील हयात नसल्यास** पुढील Slide 22 मध्ये दिल्याप्रमाणे विधी करावेत



# तयारी

यमतर्पण करणार्यांने शक्यतो धोतर / पंचा
नेसावा खांद्यावर उपरणे असावे सोबत स्वच्छ
पाण्याने भरलेले भांडे व पळी / चमचा घ्यावा पाणी
सोडण्यासाठी स्वच्छ ताम्हण / खोलगट ताटली घ्यावी

# जानवे / उपरणे घालायची पद्धत
## (स्वतः चे वडील हयात असल्यास)



मुंज झालेली असल्यास जानवे सव्य पद्धतीने
म्हणजे डाव्या खांद्यावरून उजव्या कंबरेकडे
(सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे)
घातलेले असावे. अन्यथा उपरणे डाव्या खांद्यावर ठेवावे.

# जानवे / उपरणे घालायची पद्धत
## (स्वत: चे वडील हयात नसल्यास)



मुंज झालेली असल्यास जानवे अपसव्य  पद्धतीने
म्हणजे उजव्या खांद्यावरून डाव्या कंबरेकडे
( सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे )
घातलेले असावे. अन्यथा उपरणे उजव्या खांद्यावर ठेवावे.

# पाणी देण्याची पद्धत
## (स्वतः चे वडील हयात असल्यास)



१. पाण्यात काय घालावे= काहीही नाही

२. पाणी कुठून द्यावे= दोन्ही हातांची ओंजळ करून हाताच्या बोटांकडून द्यावे
(सोबत च्या आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे)

३. पाणी किती वेळा द्यावे= प्रत्येक नावा बरोबर एकेकदा

उदाहरणार्थ :

पाहिले नाव आहे यम. आता

पूर्वेकडे तोंड करून यमाय नमः असे म्हणावे व यमदेवांचे स्मरण करून त्यांना मनातल्या मनात नमस्कार करायचा आणि पळीने एकदाच हातात पाणी घेऊन आकृतीत दाखवल्याप्रमाणे फक्त ओंजळीने ताम्हणात सोडायचे.

असे प्रत्येक नाम घेऊन १४ नामानी अर्घ्य द्यावेत.

मंदार संत

# यमद्वितीया अर्घ्यप्रदान विधी - संकल्प

**पळीने हातात पाणी घेऊन खालीलप्रमाणे संकल्प करावा**

अद्य श्रीब्रह्मणः द्वितीये परार्धे श्री श्वेतवाराहकल्पे जंबुद्विपे भरतवर्षे भरतखंडे दंडकारण्ये देशे वर्तमान व्यवहारिके विश्वावसुनाम्नी संवत्सरे दक्षिणायने शरदऋतौ कार्तिक मासे शुक्लपक्षे द्वितीयायां तिथौ बृहस्पतिवासरे विशाखादिवसनक्षत्रे आयुष्मान योगे बालव करणे तुलास्थिते श्रीचंद्रे तुलास्थिते श्रीसूर्ये कर्कस्थिते श्री देवराजगुरौ शेषेषु ग्रहेषु यथायथं राशिस्थानानिस्थितेषु अमुक (आपले गोत्र सांगावे) गोत्रस्य अमुक नाम्ना (आपले नाव सांगावे) अहं मम आत्मनः श्रुतिस्मृती पुराणोक्त शास्त्रोक्त फलप्राप्तीद्वारा अपमृत्यु निवारणपूर्वक शनैश्चरादि ग्रहपीडा परिहारद्वारा श्रीयमस्वरूपी परमेश्वर प्रीत्यर्थं चतुर्दश नाममंत्रैः यमाय अर्घ्यप्रदानं तथा च यमतर्पणाख्यं कर्म करिष्ये ।

(असे म्हणून हातातील पाणी ताम्हणात सोडावे)



# अर्घ्य दानाची नावे

१. यमाय नमः।

२. धर्मराजाय नमः।

३. मृत्युवे नमः।

४. अंतकाय नमः।

५. वैवस्वताय नमः।

६. कालाय नमः।

७. सर्वभूतक्षयाय नमः।

मंदार संत



# अर्घ्य दानाची नावे

८. औदुंबराय नमः।

९. दध्नाय नमः।

१०. नीलाय नमः।

११. परमेष्ठीने नमः।

१२. वृकोदराय नमः।

१३. चित्राय नमः।

१४. चित्रगुप्ताय नमः।

**१४ ही नावांनी तर्पण केल्यानंतर दक्षिणेकडे तोंड करून यमदेवांचे स्मरण करून खालील श्लोक १० वेळा म्हणावा.**

**यमोनिहंता पितृधर्मराजो**
**वैवस्वतो दंडधरश्च कालः।**
**भूताधिपो दत्त कृतानुसारी**
**कृतांत एतद्दशभिर्जपंति।।**

मंदार संत

आपल्या सूचना व अभिप्राय यांचे स्वागत आहे.

mandar@mandarsant.com

: ९८२२०९५६४५

मंदार संत

# ।। शुभम् भवतु ।।

सुलेखन BL Medias [ www.blmedias.com ] यांच्या सौजन्याने.